## संक्षिप्त



दिंडोरी : गाव कामगार पोलिसपाटील संघटनेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या सत्काराप्रसंगी मान्यवर. (छाया : समाधान पाटील)

### गाव कामगार पोलिसपाटील संघटना तालुकाध्यक्षपदी पांडुरंग गडकरी

**दिंडोरी :** राज्य गाव कामगार पोलिसपाटील संघ संलग्न असलेल्या दिंडोरी तालुका गाव कामगार पोलिसपाटील संघाच्या तालुकाध्यक्षपदी पांडुरंग गडकरी, तर उपाध्यक्षपदी सम्राट राऊत, महिला तालुकाध्यक्षपदी अर्चना अनवट, तर उपाध्यक्षपदी मंदाकिनी धात्रक यांची बिनविरोध निवड झाली. लखमापूर फाटा, तालुका संघाची त्रैवार्षिक निवडणूक राज्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यात जिल्हाध्यक्ष अरुण बोडके, उपजिल्हाध्यक्ष संपत जाधव, जिल्हा सचिव रवींद्र जाधव, जिल्हा उपाध्यक्ष बबन बेंडकुळे, चांदवड तालुकाध्यक्ष हिरामण देवरे, जिल्हा पदाधिकारी गजानन भोर, पुणे जिल्हा खजिनदार नीलकंठ थोरात यांची निवड झाली, तर पदाधिकारीपदी अनिल गडाख, सुरगाणा तालुकाध्यक्षपदी गोपाळ गायकवाड, शंकर तुंगार, कळवण तालुकाध्यक्ष बागूल आदींची निवडणूक झाली. या बैठकीत दिंडोरी तालुक्यातील पोलिसपाटलांनी तालुका कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली.

## निधन



### शैलजा देशपांडे

**नाशिक :** नाशिकरोड येथील रहिवासी शैलजा विजयकुमार देशपांडे (६९) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, मुलगी, जावई, पाच दीर, पाच जावा, नणंद, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार किशोर देशपांडे यांच्या त्या भावजई होत.




### बानो बाबूलाल सय्यद

**नाशिक :** आडगाव येथील बानो बाबूलाल सय्यद (७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. बबलू सय्यद, असलम रिक्षावाले यांच्या त्या आई व अल्लाउद्दिन जैनोद्दिन सय्यद यांच्या त्या मोठी बहीण होत.



### आमीन पठाण

**दिंडोरी :** पालखेड येथील आमीन दादामियाँ पठाण (८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, मुलगी, नातवंडे, सुना असा परिवार आहे. अय्याज पठाण, राजू पठाण, रफिक पठाण यांचे ते वडील होत.




### चंद्रकला कुर्लिबन्स

**नाशिक :** कामटवाडे येथील रहिवासी चंद्रकला बाबूलाल कुर्लिबन्स (७२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, जावई, नात असा परिवार आहे. पत्रकार पूजा भावसार यांच्या त्या मातोश्री होत. पंचवटीतील अमरधाममध्ये त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



### दत्तात्रेय बोरसे

**सटाणा :** येथील जुन्या पिढीतील टेलर दत्तात्रेय शंकर बोरसे (८७) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. भाजप तालुका संघटक किशोर बोरसे यांचे ते वडील होत.



### लीलाबाई कासलीवाल

**उमराणे :** येथील रहिवासी लीलाबाई जयकुमार कासलीवाल (७९) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नमोकार तीर्थ चांदवडचे ट्रस्टी जयकुमार कासलीवाल यांच्या त्या पत्नी, तर दिगंबर जैन समाजाचे कार्यकर्ते शैलेश कासलीवाल, गजपंथ जैन तीर्थक्षेत्र ट्रस्टी राजेंद्र कासलीवाल यांच्या त्या मातोश्री होत.



### विमलबाई चिमणपुरे

**उमराणे :** येथील रहिवासी विमलबाई दिगंबर चिमणपुरे (७३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. भांड्यांचे व्यापारी मनोज चिमणपुरे यांच्या त्या मातोश्री होत.



### निंबाबाई देवरे

**उमराणे :** येथील रहिवासी निंबाबाई मुरलीधर देवरे (७५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. श्री रामेश्वर भजनी मंडळाचे ज्येष्ठ सदस्य मुरलीधर लक्ष्मण देवरे यांच्या त्या पत्नी, तर ग्रामपंचायत कर्मचारी अरुण देवरे यांच्या त्या मातोश्री होत.



### लक्ष्मण शेवाळे

**मालेगाव :** सवंदगाव येथील माजी सरपंच लक्ष्मण केदा शेवाळे (७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रगतिशील शेतकरी रवींद्र व योगेश शेवाळे यांचे ते वडील होत.



### धनराज गावित

**दिंडोरी :** हेमाडपाडा (ता सुरगाणा) येथील धनराज धर्मा गावित (४५) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, दोन मुली, भाऊ, चार बहिणी असा परिवार आहे. हेमाडपाडचे सरपंच धर्मा गावित यांचे ते चिरंजीव, तर सामाजिक कार्यकर्ते दीपक भोये यांचे ते मामा होत.




### जगन्नाथ कदम

**दिंडोरी :** कोऱ्हाटे येथील निवृत्त मुख्याध्यापक जगन्नाथ देवराम कदम कोराटे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, मुली, नातू, जावई असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते नंदू कदम यांचे ते वडील होते.



### गंगाधर आहेर

**देवळा :** मटाणे येथील शेतकरी गंगाधर त्र्यंबक आहेर (९१) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. सेवानिवृत्त प्रयोगशाळा परिचर अशोक आहेर, प्रकाश आहेर व प्राथमिक शिक्षक अरुण आहेर यांचे ते वडील होत.



### रमेश देशमुख

**नाशिक :** येथील रहिवासी एचएएलचे सेवानिवृत्त कर्मचारी रमेश रामचंद्रराव देशमुख (७४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, भाऊ, बहीण, नातवंडे असा परिवार आहे.

# गोंदे- पिंपरी सदो महामार्गाच्या सहापदरीकरणासाठी सातशे कोटी

## नाशिक- मुंबई मार्गावरील वाहतूक कोंडी टळणार

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गोंदे ते पिंपरी सदो या दरम्यानच्या महामार्गाचे सहापदरीकरण करण्यासाठी ७०० कोटींच्या निधीला मंजुरी दिली आहे. त्यामुळे नाशिक-मुंबई वाहतूक कोंडी टळणार असून, धुळे, नंदुरबार आणि जळगाव या खानदेशातील प्रवाशांना समृद्धी महामार्गाला सहजपणे जोडून मुंबईला कमीत कमी वेळेत पोहोचणे शक्य होणार आहे.

गोंदे ते पिंपरी सदो या सहापदरी महामार्गाचे भूमिपूजन दि. १८ डिसेंबर रोजी ना. गडकरी यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती खासदार हेमंत गोडसे यांनी दिली. गोंदे फाटा ते पिंपरी सदो या रस्त्यावर सतत मोठी वाहतूक कोंडी होत असते. पिंपरी सदोपासून समृद्धी महामार्ग अगदीच हाकेच्या अंतरावर आहे. त्यामुळे नाशिक-मुंबई महामार्गाचे सहापदरीकरण व्हावे, यासाठी गेल्या काही महिन्यांपासून खासदार हेमंत गोडसे यांचे प्रयत्न सुरू होते. मागणीसाठी खासदार गोडसे यांनी दिल्लीत जाऊन रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली होती. नाशिक-मुंबई महामार्गावरील वाहतूक टाळण्यासाठी आणि धुळे, जळगाव, नंदुरबार येथील प्रवाशांना पिंपरी सदो शिवारातील समृद्धी महामार्गावर लवकरात लवकर पोहोचण्यासाठी गोंदे ते पिंपरी सदो या रस्त्याचे सहापदरीकरण होणे गरजेचे होते.

### २० किमी रस्त्याचे होणार काम

ना. गडकरी यांनी गोंदे ते पिंपरी सदो रस्त्याच्या सहापदरीकरणाचा निर्णय घेत या कामासाठी ७०० कोटींच्या निधीला मंजुरी दिली आहे. १८ डिसेंबर रोजी गोंदे ते पिंपरी सदो या २० किमी रस्त्याच्या सहापदरीकरणाच्या कामाचा प्रारंभ ना. नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती खासदार हेमंत गोडसे यांनी दिली.

## थंडीचा जोर ओसरल्याने दिलासा

**नाशिक :** शहरातील कमाल तापमानाचा पारा वाढल्याने गेल्या चार ते पाच दिवसांपासून थंडीचा जोर ओसरला आहे. निफाडमध्येही पाऱ्यात वाढ झाल्याने गारठा क झाला आहे.

उत्तर भारताकडून येणाऱ्या शीतलहरींचा जोर कमी झाल्याने जिल्ह्यातील गारठा नाहीसा झाला आहे. नाशिक शहरातील कमाल तापमानाचा पारा ३१ अंशांपलीकडे जाऊन स्थिरावला आहे. परिणामी शहर व परिसरातून थंडी गायब झाली आहे. त्यामुळे १० दिवसांपूर्वी हुडहुडी भरलेल्या शहरवासीयांना सध्या दिलासा मिळाला आहे. हवेत उकाडा जाणवत असल्याने नागरिकांनी उबदार कपडे बाजूला ठेवले आहेत. जिल्ह्याचा कॅलिफोर्निया अशी ओळख असलेल्या निफाड तालुक्यातही तापमानात झपाट्याने वाढ झाली. गत आठवड्यात ७ अंशांपर्यंत उतरलेल्या किमान तापमानात मंगळवारी (दि. २९) ११.२ अंशांपर्यंत वाढ झाली.

## आदर्श गावांसह शंभर मॉडेल स्कूल विकसित करणार : मित्तल

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**



समाजाच्या विकासात रोटरी संस्थेचे कार्य अमूल्य असून, जिल्ह्यात लवकरच आदर्श गाव संकल्पना तसेच शंभर मॉडेल स्कूल विकसित करण्याचा आपला मानस जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी व्यक्त केला.

रोटरी क्लब ऑफ नाशिकतर्फे राबविण्यात येणाऱ्या दीर्घकालीन सेवा प्रकल्पांचा आढावा घेणारा 'उडान' हा कार्यक्रम मित्तल यांच्या उपस्थितीत पार पडला. यात रोटरी फाउंडेशनच्या सहकार्याने राबविण्यात येणारे प्रकल्प मॅग्नम हॉस्पिटलमधील हृदय शस्त्रक्रिया सुलभ करणारे कॅथलॅब आणि नेल्सन हॉस्पिटलच्या निओनेटल आयसीयू या प्रकल्पांविषयी माहिती देण्यात आली. रोटरीचे अध्यक्ष प्रफुल्ल बरडिया यांनी कार्यक्रमाविषयी भूमिका मांडली. प्रमुख पाहुणे तथा माजी प्रांतपाल रमेश मेहेर यांच्या हस्ते देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रोटरीचे डिस्ट्रिक्ट सचिव रणजित साळवी, सचिव ओमप्रकाश रावत यांच्यासह सीएसआर संचालक कमलाकर टाक, टीआरएफ संचालक सुधीर जोशी, मंथ लीडर विनीत कोटावर, अनुजा चौगुले यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मालेगाव तालुका पोलीस स्टेशन येथे बऱ्याच कालावधीपासून अपघात, बेवारस व इतर कारणाने अनेक दुचाकी वाहने पडून आहेत. त्यांचा मालकी हक्क सांगण्यासाठी कोणीही आलेलं नाही. त्यामुळे ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांच्या आत कागदपत्रांची पूर्तता करुन, दाखवून घेऊन जावे. अन्यथा, पुढील प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. २९-११-२०२२

सही/- पोलिस निरीक्षक
तालुका पोलिस स्टेशन, मालेगाव


## .. तर राज्यपालांचे कार्यक्रम उधळून लावू : स्वराज्य

**नाशिक :** छत्रपती शिवाजी महाराजांविषयी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याविषयी स्वराज्य संघटनेच्या वतीने नाशिक जिल्हाधिकारी कार्यालय येथे आंदोलन करून निवेदन देण्यात आले. 'राज्यपाल हटवा, स्वाभिमान वाचवा', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणा देऊन जिल्हाधिकारी कार्यालय दणाणून सोडले. यावेळी पोलिसांनी विरोध केल्यामुळे पदाधिकारी कार्यकर्ते आक्रमक झाले होते. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची हकालपट्टी न केल्यास येणाऱ्या काळात राज्यपालांचे कार्यक्रम उधळून लावू, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी स्वराज्य संघटनेचे राज्य निमंत्रक गणेश कदम, जिल्हा निमंत्रक रुपेश नाठे, ज्ञानेश्वर चव्हाण, संतोष थोरात, गणेश नाठे, अजय कश्यप, सुमित कडवे, पीयूष भोसले आदी उपस्थित होते.

## दिवसा वीजपुरवठा करा

■ **शेतकऱ्यांची महावितरणकडे मागणी**

**लासलगाव : पुढारी वृत्तसेवा**

रब्बीच्या हंगामात ब्राह्मणगाव (विंचूर)च्या पूर्व भागातील शेतकऱ्यांना फक्त रात्री आठ तास वीज प्रवाह मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांनी महावितरणविरोधात संताप व्यक्त केला.

गेल्या कित्येक वर्षांपासून या भागात फक्त रात्रीच आठ तास वीज मिळते. बाकी १६ तास वीजपुरवठा खंडित असल्याने शेतकऱ्यांनी महावितरणविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. लासलगाव सबस्टेशन (ग्रामीण)अंतर्गत ब्राह्मणगाव-विंचूर फीडरवर एकूण चार ट्रान्स्फॉर्मर (डिपी) आहेत. सबस्टेशनमधून शेतकऱ्यांना सिंगल फेज सप्लाय अद्याप मिळालेला नाही. शेतकऱ्यांना कुठलीही सूचना न देता महावितरण कंपनीकडून दोन तास अतिरिक्त लोडशेडिंग चार पाच दिवसांपासून लागू केले आहे. याबाबत येथील शेतकऱ्यांनी महावितरणचे उपअभियंता सोनवणे यांना फोन करून विचारले असता त्यांनी १३२ केव्हीवरून हे लोडशेडिंग होत असल्याचे उत्तर दिले आहे. फक्त सहा तासांत कोणत्या पिकाला किती पाणी भरायचे, अशा अनेक समस्यांनी शेतकरी पिचला आहे.

> राज्यात कुठलेही सरकार स्थापन झाले तरी शेतकऱ्यांच्या जिवाशी खेळणार आहे हे आता शिंदे फडणवीस सरकारनेसुद्धा दाखवून दिले आहे. शेतकऱ्यांनाच फक्त वीजपुरवठा रात्री ११ ते सकाळी ७ पर्यंत दिला जातो. फक्त शेतकऱ्यांनाच वीज रात्रीचीच का? असा सवाल शेतकरी करत आहे.
>
> - **सुनील गवळी,** शेतकरी, ब्राह्मणगाव

## विद्यार्थिनीशी बळजबरी विवाह; सात जणांना कोठडी

**लासलगाव : पुढारी वृत्तसेवा**

रुई (ता. निफाड) येथील नाशिकला शिक्षण घेत असलेल्या २१ वर्षीय विद्यार्थिनीशी बळजबरी विवाह प्रकरणी पोलिसांनी १० जणांवर गुन्हा दाखल करत सात जणांना अटक केली.

पोलिसांत दाखल माहितीनुसार अत्याचारग्रस्त तरुणी नाशिकला केटीएचएम कॉलेजमध्ये शिक्षण घेत असून, कॅनडा कॉर्नर येथे भाड्याने रूम घेऊन राहत होती. सहा महिन्यांपूर्वी तिची संदीप नागरे (रा. डोंगर गाव) याच्याशी मैत्री झाली. परंतु, ही मैत्रीच तिच्यासाठी अतिशय घातक ठरली. संदीप याने १० नोव्हेंबरला धमकी देत बळजबरीने नाशिकला पीडित विद्यार्थिनीशी वैदिक पद्धतीने विवाह केला. विवाहाविषयी कोणाला सांगितल्यास तुझ्यासह आई-वडिलांना मारून टाकेल, अशी धमकी दिली होती. त्यामुळे हा प्रकार उघडकीस आला नव्हता. परंतु २२ नोव्हेंबरला तिला घेऊन भाऊ गावी आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. त्यातच २४ नोव्हेंबरला विद्यार्थिनीला घेऊन जाण्यासाठी बापू नागरे, अर्जुन सानप, प्रसाद शेरकर (रा. डोंगर गाव), चंद्रकांत लुंकड (रा. लासलगाव), सागर वाघ (रा. नांदगाव), दिनेश तुपे व त्याची पत्नी सोनाली तुपे (नाशिक), प्रवीण सोनवणे व एक अनोळखी महिला पीडितेच्या घरी आले. प्रवीण सोनवणे, अनिकेत नागरे, प्रसाद शेरेकर, चंद्रकांत लुंकड यांनी शस्त्राच्या आधारे तिच्या आईवडिलांना जीवे मारण्याची धमकी देत मारहाणही केली.

आजूबाजूच्या नागरिकांनी धाव घेत विद्यार्थिनीच्या कुटुंबाला संभाव्य हल्ल्यातून वाचविले. पीडित विद्यार्थिनीच्या तक्रारीवरून पोलिसांनी १० जणांवर अपहरण, बलात्कार, शस्त्र प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी मुख्य आरोपी संदीप नागरे, अनिकेत नागरे, दिनेश तुपे, चंद्रकांत लुंकड, प्रसाद शेरे, सचिन सानप, सागर वाघ यांना अटक केली आहे.


### जिल्हा परिषद, नाशिक लघुपाटबंधारे विभाग नाशिक

**जाहीर ई-निविदा सूचना कामवाटप २०२२-२०२३**
**(प्रथम प्रसारण) निविदा सूचना क्रमांक-५ नाशिक**

जिल्हा परिषद म. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक खालील कामांच्या लघुपाटबंधरे विभाग नाशिक, जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत या कार्यालयाकडे विविध लेखाशीर्षांतर्गत मिळालेल्या प्रशासकीय मान्यता विकासकामांची ई-निविदा htt:// https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ३०/११/२०२२ ते २८/१२/२०२२ या कालावधीत निविदा उक्त नमूद संकेतस्थळावर निविदांचे अवलोकन करून ऑनलाइन निविदा सादर करावी. निविदा फी व ज्या निविदांना रकमेच्या १% बयाणा रक्कम आवश्यक असणार आहे. निविदा ऑनलाइन सादर करणे विषय सविस्तर माहितीसाठी सविस्तर निविदा सूचनेचे अवलोकन htt://https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर करावे.

सही/- जिल्हा जनसंधारण अधिकारी
जिल्हा परिषद, (ल.पा.)
विभाग नाशिक

सही/-अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

### कोल्हापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम

फोन : ०२३१-२६४४५६६ ते ७१

**शहरी प्रवासी वाहतुकीसाठी Fully Built Diesel A.C. बसेस खरेदी करणेबाबत.**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. KMT/WM/1/2022**

के.एम.टी. उपक्रमाकडे शहरी प्रवासी वाहतुकीसाठी डिझेल इंधनाच्या ०९ ए.सी. बसेस खरेदी करणेत येणार आहेत. या कामगिरीची ई-निविदा राज्य शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत आली आहे. ऑनलाईन टेंडर प्रक्रिया दि. ३०/११/२०२२ रोजी पासून सुरू असून, ऑनलाईन टेंडर सादर करणेची अंतिम दि. १४/१२/२०२२ सायं. ४.०० वा. पर्यंत आहे. **विस्तृत निविदा सूचना www.kolhapurcorporation.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

कोल्हापूर,
दिनांक : २९/११/२०२२.

प्रशासक,
कोल्हापूर महानगरपालिका.

### फॉर्म ए - जाहीर घोषणा

(इन्सॉल्वन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्वन्सी रिसोल्यूशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या नियम ६ अंतर्गत)

**सेतुबंधन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (पूर्वी प्रकाश कॉन्स्ट्रोवेल लिमिटेड म्हणून ओळख) च्या क्रेडीटर्सनी लक्ष द्यावे**

| आवश्यक तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | सेतुबंधन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (पूर्वी प्रकाश कॉन्स्ट्रोवेल म्हणून ओळख) |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या निगमनाची तारीख | ०४/०१/१९९६ |
| ३. | ज्या प्राधिकाराखाली कॉर्पोरेट व्यक्तीची नोंदणी झाली | रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट आयडेंटीटी नंबर/ कॉर्पोरेट कर्जदाराचा मर्यादित उत्तरदायित्व ओळख क्र. | L45200MH1996PLC095941 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि मुख्य कार्यालयाचा (असल्यास) पत्ता | ऑफीस क्र. ए, ३ रा मजला, द एक्स्चेंज, वेद मंदिराजवळ, तिडके कॉलनी, त्रिंबक रोड, नाशिक, महाराष्ट्र ४२२००२ भारत |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या इन्सॉल्वन्सी प्रारंभाची तारीख | २८/११/२०२२ |
| ७. | इन्सॉल्वन्सी रिसोल्यूशन प्रक्रीया संपण्याची अंदाजे तारीख | २७/०५/२०२३, सीआयआरपी आदेशापासून १८० वा दिवस |
| ८. | अंतरिम रिसोल्यूशन प्रोफेशनल म्हणून काम करणाऱ्या इन्सॉल्वन्सी प्रोफेशनल यांचे नाव आणि नोंदणी क्रमांक नाव | श्री. संदीप डी. माहेश्वरी, नोंदणी क्र. : IBBI/IPA-001/IP-P00640/2017-2018/11093 |
| ९. | बोर्डाकडे नोंदणी केल्याप्रमाणे अंतरिम रिसोल्यूशन प्रोफेशनलचा पत्ता आणि ई-मेल | पत्ता : १, श्री राम लक्ष्मी निवास सीएचएस, अँथनी बेकरी जवळ, कोळबाड, ठाणे, महाराष्ट्र ४००६०१ ई-मेल : ayunish@yahoo.com |
| १०. | अंतरिम रिसोल्युशन प्रोफेशनलशी पत्रव्यवहार करण्यासाठी | पत्ता : स्ट्रेस क्रेडीट रिसोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड, बी १३०५-६, दोस्ती एलिट, रोड क्र. २९, सायन, मुंबई ४०००२२ ईमेल : setu.cirp@gmail.com |
| ११. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | १२/१२/ २०२२ सीआयआरपी आदेशाच्या दिनांकापासून १४ वा दिवस |
| १२. | अंतरिम रिसोल्यून प्रोफेशनल यांनी निश्चित केल्यानुसार कलम २१च्या उपकलम (६अ) च्या कलम (ब) अंतर्गत क्रेडीटर्सचे श्रेणी | लागू नाही. |
| १३. | श्रेणीत क्रेडीटर्सचा अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या इन्सॉल्वन्सी प्रोफेशन्ल्सची नावे(प्रत्येक श्रेणीत तीन नावे) | लागू नाही. |
| १४. | अ) संबंधित अर्ज आणि ब) अधिकृत प्रतिनिधींची नावे इथे उपलब्ध आहेत | (अ) वेब लिंक :https://www.stresscredit.com/downloads/ (ब) लागू नाही. |

इथे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा लवाद, मुंबई शाखा यांनी सेतुबंधन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (पूर्वी प्रकाश कॉन्स्ट्रोवेल लिमिटेड म्हणून ओळख)च्या कॉर्पोरेट इन्सॉल्वन्सी रिसोल्यून प्रकिया २८ नोव्हेंबर २०२२ रोजी सुरू केली.
सेतुबंधन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (पूर्वी प्रकाश कॉन्स्ट्रोवेल म्हणून ओळख)चे क्रेडीटर्स यांना इथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे १२ डिसेंबर २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी क्र.१० मध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम रिसोल्यूशन प्रोफेशनल यांच्याकडे सादर करावा.
संबंधित अर्ज वेबसाईट https:// www.stresscredit.com/downloads/ वरून डाऊनलोड करून घ्यावेत फायनान्शियल क्रेडीटर्सनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारेच सादर करायचे आहेत. इतर सर्व क्रेडीटर्सनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे प्रत्यक्षपणे, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे सादर करावेत.
**दाव्यांचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंडास पात्र ठरेल.**

स्वाक्षरी /-
संदीप डी. माहेश्वरी
अंतरिम रिसोल्यूशन प्रोफेशनल
Reg. No. IBBI/IPA-001/IP-P00640/2017-2018/11093

दिनांक : ३० नोव्हेंबर २०२२
ठिकाण : ठाणे

### समता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोपरगांव

विश्वास + सुरक्षितता = समता

**सोने तारण जाहीर लिलाव नोटीस**

**समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कोपरगांव, शाखा - येवला** शाखेचे खालील नमुद केलेले खात्यांचे **सोने तारण** कर्जदार यांना वारंवार मुदत संपलेचे पत्र,स्मरण पत्र,लिलाव नोटीस रजिष्ट्रर ए.डी. पाठवलेली असुन ती त्यांना मिळालेली आहे. तरीही त्यांनी मुदतीत कर्ज परतफेड केलेली नाही अथवा खाते नुतणीकरण केले नाही. खालील थकबाकीदाराकडील थकबाकी वसुलीसाठी त्यांचे कर्जाचे तारणापोटी ठेवलेल्या दागिण्यांचा जाहीर लिलाव **गुरुवार दि. १५/१२/२०२२ रोजी** खालील नमुद ठिकाणी शाखा कार्यालयात करण्यात येणार आहे. तरी इच्छुक खरेदीदारांनी नमुद केलेल्या ठिकाणी उपस्थित रहावे. मात्र लिलावाचे पुर्वी थकीत कर्जदाराने कर्जफेड वा कर्ज नुतणीकरण केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाचे वेळी वाचुन दाखविण्यात येतील. लिलाव स्थगित ठेवणे व लिलाव मुदत वाढ देणे,रद्द करणे याबाबत सर्व अधिकार संस्थेने राखुन ठेवले आहेत.

| खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | लिलावाची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| २७२९ | मोहरे अशोक बिहारीलाल | २२३३७ | सुरसे निवृत्ती विठ्ठल | २४५८१ | शिंदे राहुल रावसाहेब | दि.१५/१२/२०२२ रोजी<br>वार - गुरुवार<br>वेळ - दु.१२.३० वा.<br><br>लिलावाचे ठिकाण<br>समता नागरी सह.पतसंस्था मर्या., कोपरगांव यांचे<br>शाखा - येवला<br><br>फत्तेबुरुज नाका, जंगली महाराज कमान जवळ, येवला<br>ता.येवला जि.नाशिक |
| १०८१२ | शिंदे उमेश दत्तात्रय | २२५३९ | सोनवणे सुनील कोंडाजी | २४५८४ | गायकवाड शिवाजी पोपट | |
| १८८०७ | शिरगुळे बाबासाहेब काशिनाथ | २२५५१ | लोढा दिलीप हिरालाल | ५४२१ | सातपुते किरण प्रभाकर | |
| १८८४६ | बोरकर निलम विशाल | २२९३८ | दुकळे संतोष भिला | २४७९८ | जमधडे अण्णा श्रीपत | |
| १९०६७ | अन्सारी नदीम अहमद अब्दुल कादीर | २३१३५ | पगारे मीना राजेंद्र | २४८०४ | गवळी बाळू अरुण | |
| १९१९४ | आवारे मिलिंद अशोक | १४८०९ | भड मारुती नारायण | २४८१० | थोरात सागर विलास | |
| १९२१६ | गंजे किरण धनाजी | २३२५३ | जाधव विजय कारभारी | २४८१२ | थोरात सागर विलास | |
| ३१८४ | गायकवाड भाऊसाहेब सुकदेव | २३२६७ | जंगम नितेश दत्तात्रय | २४८७९ | पराते किशोर हिरामण | |
| १९४९८ | वाकचौरे मयूर सुनील | २३२७९ | कांदेकर राजेंद्र किसन | २५१२० | जगताप गणेश शरद | |
| २०६२७ | बोथे विठ्ठल लक्ष्मण | २३२९२ | गंजे ऋषिकेश एकनाथ | २५२९२ | सोनवणे केशव सोनू | |
| २०७८७ | बटवाल प्रशांत ज्ञानेश्वर | २३२९५ | राजगुरू राहुल केशव | २५३८१ | कवडे प्रल्हाद मधुकर | |
| २०८०७ | गायकवाड संजय आसाराम | २३३०४ | पिंगळे दत्तात्रय कारभारी | २५३८८ | सोमसे कांताराम मुरलीधर | |
| ४८५२ | बोंबले समाधान प्रभाकर | २३३०५ | शितो किरण नंदकिशोर | २५३९२ | गायकवाड नारायण बाबुराव | |
| २०९४८ | त्रिभुवन मोहन भाऊसाहेब | २३३०६ | वारे पंकज अशोक | ८१९२ | वालाके शांता भाऊसाहेब | |
| २१००७ | कुडके भारती चेतन | २३३०८ | दराडे कृष्णा वाल्मिक | २५७८३ | कापसे अण्णासाहेब रामदास | |
| २१०७६ | बटवाल प्रशांत ज्ञानेश्वर | २३३९२ | अहमदनसरी रफिया नेहल | २५८१४ | सागर राहुल रमेश | |
| २१३०७ | शेटे गणेश अशोक | २३४०८ | गायकवाड राहुल अशोक | २५८७२ | बैरागी पुरुषोत्तम गणेश | |
| २१५४४ | शेख नदीम हसन | २३४१५ | आहेर वाल्मिक बाबासाहेब | २५९१९ | थोरात सागर विलास | |
| २१७७७ | ठोंबरे संजय माधव | २३५९५ | गायकवाड प्रवीण रमेश | २५९२१ | राजपूत सीमा सागर | |
| २१८४९ | कारवार दत्तू ठकाजी | २३८६० | पगारे अतुल नामदेव | २५९२३ | थोरात सागर विलास | |
| २१९२४ | शेख जब्बार रज्जाक | २३८८० | मोरे रामकृष्ण जगन्नाथ | २५९७८ | गंजे सोपान धनाजी | |
| २२०८४ | गायकवाड विजय जगन्नाथ | २३९७५ | गायकवाड योगेश बाळासाहेब | २६०२५ | शिंदे राहुल अरुण | |
| २२०९५ | हंडी अंजली नितीन | २३९९२ | शेख जब्बार रज्जाक | ३२४५ | कदम अमोल दत्तात्रय | |
| २२०९८ | पवार सावित्रीबाई शिवाजी | २३९९७ | गंजे किरण धनाजी | २६४४६ | शेलार रवींद्र विठ्ठल | |
| २२१०२ | जानराव नवनाथ चंद्रशेखर | २४१२८ | रायके सागर राजेंद्र | २६४५१ | चव्हाण दिलीप विजय | |
| २२१८२ | क्षत्रिय गणेश राजेंद्र | २४२३५ | जंगम नितेश दत्तात्रय | २६५३९ | चवरे रुपाली रामदास | |
| २२२२१ | वारे पंकज अशोक | २४३४५ | मिटके शंभू श्रावण | २६६७१ | घरू सोनी मनोज | |
| २२२५९ | कांदेकर राजेंद्र किसन | २४४२३ | गंजे ऋषिकेश एकनाथ | २६७४६ | पवार सतीश तुकाराम | |
| २२३१९ | तांगडे सुलोचना बालनाथ | २४५५० | पवार गोरख गोपीनाथ | | | |

**लिलावाच्या अटी शर्ती :-**

१) लिलावात भाग घेणारास रु.२०,०००/-रोख भरुन भाग घ्यावा लागेल.
२) लिलाव मंजूर,नामंजूर किंवा स्थगित करणेचा अधिकार संचालक मंडळाने राखुन ठेवला आहे.
३) अन्य अटी व शर्ती लिलावाच्या वेळी वाचुन दाखविण्यात येतील.

सही/-
शाखाधिकारी
समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या,कोपरगांव

## संक्षिप्त



दिंडोरी : गाव कामगार पोलिसपाटील संघटनेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या सत्काराप्रसंगी मान्यवर. (छाया : समाधान पाटील)

### गाव कामगार पोलिसपाटील संघटना तालुकाध्यक्षपदी पांडुरंग गडकरी


**दिंडोरी :** राज्य गाव कामगार पोलिसपाटील संघ संलग्न असलेल्या दिंडोरी तालुका गाव कामगार पोलिसपाटील संघाच्या तालुकाध्यक्षपदी पांडुरंग गडकरी, तर उपाध्यक्षपदी सम्राट राऊत, महिला तालुकाध्यक्षपदी अर्चना अनवट, तर उपाध्यक्षपदी मंदाकिनी धात्रक यांची बिनविरोध निवड झाली. लखमापूर फाटा, तालुका संघाची त्रैवार्षिक निवडणूक राज्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यात जिल्हाध्यक्ष अरुण बोडके, उपजिल्हाध्यक्ष संपत जाधव, जिल्हा सचिव रवींद्र जाधव, जिल्हा उपाध्यक्ष बबन बेंडकुळे, चांदवड तालुकाध्यक्ष हिरामण देवरे, जिल्हा पदाधिकारी गजानन भोर, पुणे जिल्हा खजिनदार नीलकंठ थोरात यांची निवड झाली, तर पदाधिकारीपदी अनिल गडाख, सुरगाणा तालुकाध्यक्षपदी गोपाळ गायकवाड, शंकर तुंगार, कळवण तालुकाध्यक्ष बागूल आदींची निवडणूक झाली. या बैठकीत दिंडोरी तालुक्यातील पोलिसपाटलांनी तालुका कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली.

## निधन




### शैलजा देशपांडे

**नाशिक :** नाशिकरोड येथील रहिवासी शैलजा विजयकुमार देशपांडे (६९) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, मुलगी, जावई, पाच दीर, पाच जावा, नणंद, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार किशोर देशपांडे यांच्या त्या भावजई होत.



### बानो बाबूलाल सय्यद

**नाशिक :** आडगाव येथील बानो बाबूलाल सय्यद (७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. बबलू सय्यद, असलम रिक्षावाले यांच्या त्या आई व अल्लाउद्दिन जैनोद्दिन सय्यद यांच्या त्या मोठी बहीण होत.



### आमीन पठाण

**दिंडोरी :** पालखेड येथील आमीन दादामियाँ पठाण (८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, मुलगी, नातवंडे, सुना असा परिवार आहे. अय्याज पठाण, राजू पठाण, रफिक पठाण यांचे ते वडील होत.




### चंद्रकला कुर्लिबन्स

**नाशिक :** कामटवाडे येथील रहिवासी चंद्रकला बाबूलाल कुर्लिबन्स (७२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, जावई, नात असा परिवार आहे. पत्रकार पूजा भावसार यांच्या त्या मातोश्री होत. पंचवटीतील अमरधाममध्ये त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



### दत्तात्रेय बोरसे

**सटाणा :** येथील जुन्या पिढीतील टेलर दत्तात्रेय शंकर बोरसे (८७) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. भाजप तालुका संघटक किशोर बोरसे यांचे ते वडील होत.



### लीलाबाई कासलीवाल

**उमराणे :** येथील रहिवासी लीलाबाई जयकुमार कासलीवाल (७९) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नमोकार तीर्थ चांदवडचे ट्रस्टी जयकुमार कासलीवाल यांच्या त्या पत्नी, तर दिगंबर जैन समाजाचे कार्यकर्ते शैलेश कासलीवाल, गजपंथ जैन तीर्थक्षेत्र ट्रस्टी राजेंद्र कासलीवाल यांच्या त्या मातोश्री होत.



### विमलबाई चिमणपुरे

**उमराणे :** येथील रहिवासी विमलबाई दिगंबर चिमणपुरे (७३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. भांड्यांचे व्यापारी मनोज चिमणपुरे यांच्या त्या मातोश्री होत.



### निंबाबाई देवरे

**उमराणे :** येथील रहिवासी निंबाबाई मुरलीधर देवरे (७५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. श्री रामेश्वर भजनी मंडळाचे ज्येष्ठ सदस्य मुरलीधर लक्ष्मण देवरे यांच्या त्या पत्नी, तर ग्रामपंचायत कर्मचारी अरुण देवरे यांच्या त्या मातोश्री होत.



### लक्ष्मण शेवाळे

**मालेगाव :** सवंदगाव येथील माजी सरपंच लक्ष्मण केदा शेवाळे (७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रगतिशील शेतकरी रवींद्र व योगेश शेवाळे यांचे ते वडील होत.



### धनराज गावित

**दिंडोरी :** हेमाडपाडा (ता सुरगाणा) येथील धनराज धर्मा गावित (४५) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, दोन मुली, भाऊ, चार बहिणी असा परिवार आहे. हेमाडपाडचे सरपंच धर्मा गावित यांचे ते चिरंजीव, तर सामाजिक कार्यकर्ते दीपक भोये यांचे ते मामा होत.




### जगन्नाथ कदम

**दिंडोरी :** कोऱ्हाटे येथील निवृत्त मुख्याध्यापक जगन्नाथ देवराम कदम कोराटे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, मुली, नातू, जावई असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते नंदू कदम यांचे ते वडील होते.



### गंगाधर आहेर

**देवळा :** मटाणे येथील शेतकरी गंगाधर त्र्यंबक आहेर (९१) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. सेवानिवृत्त प्रयोगशाळा परिचर अशोक आहेर, प्रकाश आहेर व प्राथमिक शिक्षक अरुण आहेर यांचे ते वडील होत.



### रमेश देशमुख

**नाशिक :** येथील रहिवासी एचएएलचे सेवानिवृत्त कर्मचारी रमेश रामचंद्रराव देशमुख (७४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, भाऊ, बहीण, नातवंडे असा परिवार आहे.

# गोंदे- पिंपरी सदो महामार्गाच्या सहापदरीकरणासाठी सातशे कोटी

## नाशिक- मुंबई मार्गावरील वाहतूक कोंडी टळणार

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गोंदे ते पिंपरी सदो या दरम्यानच्या महामार्गाचे सहापदरीकरण करण्यासाठी ७०० कोटींच्या निधीला मंजुरी दिली आहे. त्यामुळे नाशिक-मुंबई वाहतूक कोंडी टळणार असून, धुळे, नंदुरबार आणि जळगाव या खानदेशातील प्रवाशांना समृद्धी महामार्गाला सहजपणे जोडून मुंबईला कमीत कमी वेळेत पोहोचणे शक्य होणार आहे.

गोंदे ते पिंपरी सदो या सहापदरी महामार्गाचे भूमिपूजन दि. १८ डिसेंबर रोजी ना. गडकरी यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती खासदार हेमंत गोडसे यांनी दिली. गोंदे फाटा ते पिंपरी सदो या रस्त्यावर सतत मोठी वाहतूक कोंडी होत असते. पिंपरी सदोपासून समृद्धी महामार्ग अगदीच हाकेच्या अंतरावर आहे. त्यामुळे नाशिक-मुंबई महामार्गाचे सहापदरीकरण व्हावे, यासाठी गेल्या काही महिन्यांपासून खासदार हेमंत गोडसे यांचे प्रयत्न सुरू होते. मागणीसाठी खासदार गोडसे यांनी दिल्लीत जाऊन रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली होती. नाशिक-मुंबई महामार्गावरील वाहतूक टाळण्यासाठी आणि धुळे, जळगाव, नंदुरबार येथील प्रवाशांना पिंपरी सदो शिवारातील समृद्धी महामार्गावर लवकरात लवकर पोहोचण्यासाठी गोंदे ते पिंपरी सदो या रस्त्याचे सहापदरीकरण होणे गरजेचे होते.

### २० किमी रस्त्याचे होणार काम

ना. गडकरी यांनी गोंदे ते पिंपरी सदो रस्त्याच्या सहापदरीकरणाचा निर्णय घेत या कामासाठी ७०० कोटींच्या निधीला मंजुरी दिली आहे. १८ डिसेंबर रोजी गोंदे ते पिंपरी सदो या २० किमी रस्त्याच्या सहापदरीकरणाच्या कामाचा प्रारंभ ना. नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती खासदार हेमंत गोडसे यांनी दिली.

## थंडीचा जोर ओसरल्याने दिलासा

**नाशिक :** शहरातील कमाल तापमानाचा पारा वाढल्याने गेल्या चार ते पाच दिवसांपासून थंडीचा जोर ओसरला आहे. निफाडमध्येही पाऱ्यात वाढ झाल्याने गारठा क झाला आहे.

उत्तर भारताकडून येणाऱ्या शीतलहरींचा जोर कमी झाल्याने जिल्ह्यातील गारठा नाहीसा झाला आहे. नाशिक शहरातील कमाल तापमानाचा पारा ३१ अंशांपलीकडे जाऊन स्थिरावला आहे. परिणामी शहर व परिसरातून थंडी गायब झाली आहे. त्यामुळे १० दिवसांपूर्वी हुडहुडी भरलेल्या शहरवासीयांना सध्या दिलासा मिळाला आहे. हवेत उकाडा जाणवत असल्याने नागरिकांनी उबदार कपडे बाजूला ठेवले आहेत. जिल्ह्याचा कॅलिफोर्निया अशी ओळख असलेल्या निफाड तालुक्यातही तापमानात झपाट्याने वाढ झाली. गत आठवड्यात ७ अंशांपर्यंत उतरलेल्या किमान तापमानात मंगळवारी (दि. २९) ११.२ अंशांपर्यंत वाढ झाली.

## आदर्श गावांसह शंभर मॉडेल स्कूल विकसित करणार : मित्तल

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**



समाजाच्या विकासात रोटरी संस्थेचे कार्य अमूल्य असून, जिल्ह्यात लवकरच आदर्श गाव संकल्पना तसेच शंभर मॉडेल स्कूल विकसित करण्याचा आपला मानस जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी व्यक्त केला.

रोटरी क्लब ऑफ नाशिकतर्फे राबविण्यात येणाऱ्या दीर्घकालीन सेवा प्रकल्पांचा आढावा घेणारा 'उडान' हा कार्यक्रम मित्तल यांच्या उपस्थितीत पार पडला. यात रोटरी फाउंडेशनच्या सहकार्याने राबविण्यात येणारे प्रकल्प मॅग्नम हॉस्पिटलमधील हृदय शस्त्रक्रिया सुलभ करणारे कॅथलॅब आणि नेल्सन हॉस्पिटलच्या निओनेटल आयसीयू या प्रकल्पांविषयी माहिती देण्यात आली. रोटरीचे अध्यक्ष प्रफुल्ल बरडिया यांनी कार्यक्रमाविषयी भूमिका मांडली. प्रमुख पाहुणे तथा माजी प्रांतपाल रमेश मेहेर यांच्या हस्ते देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रोटरीचे डिस्ट्रिक्ट सचिव रणजित साळवी, सचिव ओमप्रकाश रावत यांच्यासह सीएसआर संचालक कमलाकर टाक, टीआरएफ संचालक सुधीर जोशी, मंथ लीडर विनीत कोटावर, अनुजा चौगुले यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मालेगाव तालुका पोलीस स्टेशन येथे बऱ्याच कालावधीपासून अपघात, बेवारस व इतर कारणाने अनेक दुचाकी वाहने पडून आहेत. त्यांचा मालकी हक्क सांगण्यासाठी कोणीही आलेलं नाही. त्यामुळे ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांच्या आत कागदपत्रांची पूर्तता करुन, दाखवून घेऊन जावे. अन्यथा, पुढील प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. २९-११-२०२२

सही/- **पोलिस निरीक्षक**
**तालुका पोलिस स्टेशन, मालेगाव**


## .. तर राज्यपालांचे कार्यक्रम उधळून लावू : स्वराज्य

**नाशिक :** छत्रपती शिवाजी महाराजांविषयी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याविषयी स्वराज्य संघटनेच्या वतीने नाशिक जिल्हाधिकारी कार्यालय येथे आंदोलन करून निवेदन देण्यात आले. 'राज्यपाल हटवा, स्वाभिमान वाचवा', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणा देऊन जिल्हाधिकारी कार्यालय दणाणून सोडले. यावेळी पोलिसांनी विरोध केल्यामुळे पदाधिकारी कार्यकर्ते आक्रमक झाले होते. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची हकालपट्टी न केल्यास येणाऱ्या काळात राज्यपालांचे कार्यक्रम उधळून लावू, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी स्वराज्य संघटनेचे राज्य निमंत्रक गणेश कदम, जिल्हा निमंत्रक रुपेश नाठे, ज्ञानेश्वर चव्हाण, संतोष थोरात, गणेश नाठे, अजय कश्यप, सुमित कडवे, पीयूष भोसले आदी उपस्थित होते.

## दिवसा वीजपुरवठा करा

■ **शेतकऱ्यांची महावितरणकडे मागणी**

**लासलगाव : पुढारी वृत्तसेवा**

रब्बीच्या हंगामात ब्राह्मणगाव (विंचूर)च्या पूर्व भागातील शेतकऱ्यांना फक्त रात्री आठ तास वीज प्रवाह मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांनी महावितरणविरोधात संताप व्यक्त केला.

गेल्या कित्येक वर्षांपासून या भागात फक्त रात्रीच आठ तास वीज मिळते. बाकी १६ तास वीजपुरवठा खंडित असल्याने शेतकऱ्यांनी महावितरणविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. लासलगाव सबस्टेशन (ग्रामीण)अंतर्गत ब्राह्मणगाव-विंचूर फीडरवर एकूण चार ट्रान्सफॉर्मर (डिपी) आहेत. सबस्टेशनमधून शेतकऱ्यांना सिंगल फेज सप्लाय अद्याप मिळालेला नाही. शेतकऱ्यांना कुठलीही सूचना न देता महावितरण कंपनीकडून दोन तास अतिरिक्त लोडशेडिंग चार पाच दिवसांपासून लागू केले आहे. याबाबत येथील शेतकऱ्यांनी महावितरणचे उपअभियंता सोनवणे यांना फोन करून विचारले असता त्यांनी १३२ केव्हीवरून हे लोडशेडिंग होत असल्याचे उत्तर दिले आहे. फक्त सहा तासांत कोणत्या पिकाला किती पाणी भरायचे, अशा अनेक समस्यांनी शेतकरी पिचला आहे.

> राज्यात कुठलेही सरकार स्थापन झाले तरी शेतकऱ्यांच्या जिवाशी खेळणार आहे हे आता शिंदे फडणवीस सरकारनेसुद्धा दाखवून दिले आहे. शेतकऱ्यांनाच फक्त वीजपुरवठा रात्री ११ ते सकाळी ७ पर्यंत दिला जातो. फक्त शेतकऱ्यांनाच वीज रात्रीचीच का? असा सवाल शेतकरी करत आहे.
>
> - **सुनील गवळी,** शेतकरी, ब्राह्मणगाव

## विद्यार्थिनीशी बळजबरी विवाह; सात जणांना कोठडी

**लासलगाव : पुढारी वृत्तसेवा**

रुई (ता. निफाड) येथील नाशिकला शिक्षण घेत असलेल्या २१ वर्षीय विद्यार्थिनीशी बळजबरी विवाह प्रकरणी पोलिसांनी १० जणांवर गुन्हा दाखल करत सात जणांना अटक केली.

पोलिसांत दाखल माहितीनुसार अत्याचारग्रस्त तरुणी नाशिकला केटीएचएम कॉलेजमध्ये शिक्षण घेत असून, कॅनडा कॉर्नर येथे भाड्याने रूम घेऊन राहत होती. सहा महिन्यांपूर्वी तिची संदीप नागरे (रा. डोंगर गाव) याच्याशी मैत्री झाली. परंतु, ही मैत्रीच तिच्यासाठी अतिशय घातक ठरली. संदीप याने १० नोव्हेंबरला धमकी देत बळजबरीने नाशिकला पीडित विद्यार्थिनीशी वैदिक पद्धतीने विवाह केला. विवाहाविषयी कोणाला सांगितल्यास तुझ्यासह आई-वडिलांना मारून टाकेल, अशी धमकी दिली होती. त्यामुळे हा प्रकार उघडकीस आला नव्हता. परंतु २२ नोव्हेंबरला तिला घेऊन भाऊ गावी आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. त्यातच २४ नोव्हेंबरला विद्यार्थिनीला घेऊन जाण्यासाठी बापू नागरे, अर्जुन सानप, प्रसाद शेरकर (रा. डोंगर गाव), चंद्रकांत लुंकड (रा. लासलगाव), सागर वाघ (रा. नांदगाव), दिनेश तुपे व त्याची पत्नी सोनाली तुपे (नाशिक), प्रवीण सोनवणे व एक अनोळखी महिला पीडितेच्या घरी आले. प्रवीण सोनवणे, अनिकेत नागरे, प्रसाद शेरेकर, चंद्रकांत लुंकड यांनी शस्त्राच्या आधारे तिच्या आईवडिलांना जीवे मारण्याची धमकी देत मारहाणही केली.

आजूबाजूच्या नागरिकांनी धाव घेत विद्यार्थिनीच्या कुटुंबाला संभाव्य हल्ल्यातून वाचविले. पीडित विद्यार्थिनीच्या तक्रारीवरून पोलिसांनी १० जणांवर अपहरण, बलात्कार, शस्त्र प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी मुख्य आरोपी संदीप नागरे, अनिकेत नागरे, दिनेश तुपे, चंद्रकांत लुंकड, प्रसाद शेरे, सचिन सानप, सागर वाघ यांना अटक केली आहे.


### जिल्हा परिषद, नाशिक लघुपाटबंधारे विभाग नाशिक

**जाहीर ई-निविदा सूचना कामवाटप २०२२-२०२३ (प्रथम प्रसारण) निविदा सूचना क्रमांक-५ नाशिक**

जिल्हा परिषद म. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक खालील कामांच्या लघुपाटबंधरे विभाग नाशिक, जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत या कार्यालयाकडे विविध लेखाशीर्षांतर्गत मिळालेल्या प्रशासकीय मान्यता विकासकामांची ई-निविदा htt:// https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ३०/११/२०२२ ते २८/१२/२०२२ या कालावधीत निविदा उक्त नमूद संकेतस्थळावर निविदांचे अवलोकन करून ऑनलाइन निविदा सादर करावी. निविदा फी व ज्या निविदांना रकमेच्या १% बयाणा रक्कम आवश्यक असणार आहे. निविदा ऑनलाइन सादर करणे विषय सविस्तर माहितीसाठी सविस्तर निविदा सूचनेचे अवलोकन htt://https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर करावे.

सही/- **जिल्हा जनसंधारण अधिकारी**
जिल्हा परिषद, (ल.पा.)
विभाग नाशिक

सही/- **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद, नाशिक

### कोल्हापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम

फोन : ०२३१-२६४४५६६ ते ७१

**शहरी प्रवासी वाहतुकीसाठी Fully Built Diesel A.C. बसेस खरेदी करणेबाबत.**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. KMT/WM/1/2022**

के.एम.टी. उपक्रमाकडे शहरी प्रवासी वाहतुकीसाठी डिझेल इंधनाच्या ०९ ए.सी. बसेस खरेदी करणेत येणार आहेत. या कामगिरीची ई-निविदा राज्य शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत आली आहे. ऑनलाईन टेंडर प्रक्रिया दि. ३०/११/२०२२ रोजी पासून सुरू असून, ऑनलाईन टेंडर सादर करणेची अंतिम दि. १४/१२/२०२२ सायं. ४.०० वा. पर्यंत आहे. **विस्तृत निविदा सूचना www.kolhapurcorporation.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

कोल्हापूर, दिनांक : २९/११/२०२२.

प्रशासक, कोल्हापूर महानगरपालिका.

### फॉर्म ए - जाहीर घोषणा

(इन्सॉल्वन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्वन्सी रिसोल्यूशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या नियम ६ अंतर्गत)

**सेतुबंधन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (पूर्वी प्रकाश कॉन्स्ट्रोवेल लिमिटेड म्हणून ओळख) च्या क्रेडीटर्सनी लक्ष द्यावे**

| आवश्यक तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | सेतुबंधन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (पूर्वी प्रकाश कॉन्स्ट्रोवेल म्हणून ओळख) |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या निगमनाची तारीख | ०४/०१/१९९६ |
| ३. | ज्या प्राधिकाराखाली कॉर्पोरेट व्यक्तीची नोंदणी झाली | रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट आयडेंटीटी नंबर/ कॉर्पोरेट कर्जदाराचा मर्यादित उत्तरदायित्व ओळख क्र. | L45200MH1996PLC095941 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि मुख्य कार्यालयाचा (असल्यास) पत्ता | ऑफीस क्र. ए, ३ रा मजला, द एक्स्चेंज, वेद मंदिराजवळ, तिडके कॉलनी, त्रिंबक रोड, नाशिक, महाराष्ट्र ४२२००२ भारत |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या इन्सॉल्वन्सी प्रारंभाची तारीख | २८/११/२०२२ |
| ७. | इन्सॉल्वन्सी रिसोल्यूशन प्रक्रीया संपण्याची अंदाजे तारीख | २७/०५/२०२३, सीआयआरपी आदेशापासून १८० वा दिवस |
| ८. | अंतरिम रिसोल्यूशन प्रोफेशनल म्हणून काम करणाऱ्या इन्सॉल्वन्सी प्रोफेशनल यांचे नाव आणि नोंदणी क्रमांक नाव | श्री. संदीप डी. माहेश्वरी, नोंदणी क्र. : IBBI/IPA-001/IP-P00640/2017-2018/11093 |
| ९. | बोर्डाकडे नोंदणी केल्याप्रमाणे अंतरिम रिसोल्यूशन प्रोफेशनलचा पत्ता आणि ई-मेल | पत्ता : १, श्री राम लक्ष्मी निवास सीएचएस, अँथनी बेकरी जवळ, कोळबाड, ठाणे, महाराष्ट्र ४००६०१ ई-मेल : ayunish@yahoo.com |
| १०. | अंतरिम रिसोल्युशन प्रोफेशनलशी पत्रव्यवहार करण्यासाठी | पत्ता : स्ट्रेस क्रेडीट रिसोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड, बी १३०५-६, दोस्ती एलिट, रोड क्र. २९, सायन, मुंबई ४०००२२ ईमेल : setu.cirp@gmail.com |
| ११. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | १२/१२/ २०२२ सीआयआरपी आदेशाच्या दिनांकापासून १४ वा दिवस |
| १२. | अंतरिम रिसोल्यून प्रोफेशनल यांनी निश्चित केल्यानुसार कलम २१च्या उपकलम (६अ) च्या कलम (ब) अंतर्गत क्रेडीटर्सचे श्रेणी | लागू नाही. |
| १३. | श्रेणीत क्रेडीटर्सचा अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या इन्सॉल्वन्सी प्रोफेशन्ल्सची नावे(प्रत्येक श्रेणीत तीन नावे) | लागू नाही. |
| १४. | अ) संबंधित अर्ज आणि ब) अधिकृत प्रतिनिधींची नावे इथे उपलब्ध आहेत | (अ) वेब लिंक :https://www.stresscredit.com/downloads/ (ब) लागू नाही. |

इथे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा लवाद, मुंबई शाखा यांनी सेतुबंधन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (पूर्वी प्रकाश कॉन्स्ट्रोवेल लिमिटेड म्हणून ओळख)च्या कॉर्पोरेट इन्सॉल्वन्सी रिसोल्यून प्रकिया २८ नोव्हेंबर २०२२ रोजी सुरू केली.
सेतुबंधन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (पूर्वी प्रकाश कॉन्स्ट्रोवेल म्हणून ओळख)चे क्रेडीटर्स यांना इथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे १२ डिसेंबर २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी क्र.१० मध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम रिसोल्यूशन प्रोफेशनल यांच्याकडे सादर करावा.
संबंधित अर्ज वेबसाईट https:// www.stresscredit.com/downloads/ वरून डाऊनलोड करून घ्यावेत फायनान्शियल क्रेडीटर्सनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारेच सादर करायचे आहेत. इतर सर्व क्रेडीटर्सनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे प्रत्यक्षपणे, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे सादर करावेत.
**दाव्यांचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंडास पात्र ठरेल.**

स्वाक्षरी /-
संदीप डी. माहेश्वरी
अंतरिम रिसोल्यूशन प्रोफेशनल
Reg. No. IBBI/IPA-001/IP-P00640/2017-2018/11093

दिनांक : ३० नोव्हेंबर २०२२
ठिकाण : ठाणे

## समता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोपरगांव

विश्वास + सुरक्षितता = समता

**सोने तारण जाहीर लिलाव नोटीस**

**समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कोपरगांव, शाखा - येवला** शाखेचे खालील नमुद केलेले खात्यांचे **सोने तारण** कर्जदार यांना वारंवार मुदत संपलेचे पत्र,स्मरण पत्र,लिलाव नोटीस रजिष्ट्रर ए.डी. पाठवलेली असुन ती त्यांना मिळालेली आहे. तरीही त्यांनी मुदतीत कर्ज परतफेड केलेली नाही अथवा खाते नुतणीकरण केले नाही. खालील थकबाकीदाराकडील थकबाकी वसुलीसाठी त्यांचे कर्जाचे तारणापोटी ठेवलेल्या दागिण्यांचा जाहीर लिलाव **गुरुवार दि. १५/१२/२०२२ रोजी** खालील नमुद ठिकाणी शाखा कार्यालयात करण्यात येणार आहे. तरी इच्छुक खरेदीदारांनी नमुद केलेल्या ठिकाणी उपस्थित रहावे. मात्र लिलावाचे पुर्वी थकीत कर्जदाराने कर्जफेड वा कर्ज नुतणीकरण केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाचे वेळी वाचुन दाखविण्यात येतील. लिलाव स्थगित ठेवणे व लिलाव मुदत वाढ देणे,रद्द करणे याबाबत सर्व अधिकार संस्थेने राखुन ठेवले आहेत.

| खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | लिलावाची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| २७२९ | मोहरे अशोक बिहारीलाल | २२३३७ | सुरसे निवृत्ती विठ्ठल | २४५८१ | शिंदे राहुल रावसाहेब | दि.१५/१२/२०२२ रोजी वार - गुरुवार वेळ - दु.१२.३० वा. |
| १०८१२ | शिंदे उमेश दत्तात्रय | २२५३९ | सोनवणे सुनील कोंडाजी | २४५८४ | गायकवाड शिवाजी पोपट | |
| १८८०७ | शिरगुळे बाबासाहेब काशिनाथ | २२५५१ | लोढा दिलीप हिरालाल | ५४२१ | सातपुते किरण प्रभाकर | |
| १८८४६ | बोरकर निलम विशाल | २२९३८ | दुकळे संतोष भिला | २४७९८ | जमधडे अण्णा श्रीपत | **लिलावाचे ठिकाण** |
| १९०६७ | अन्सारी नदीम अहमद अब्दुल कादीर | २३१३५ | पगारे मीना राजेंद्र | २४८०४ | गवळी बाळू अरुण | समता नागरी सह.पतसंस्था मर्या., कोपरगांव **यांचे शाखा - येवला** |
| १९१९४ | आवारे मिलिंद अशोक | १४८०९ | भड मारुती नारायण | २४८१० | थोरात सागर विलास | |
| १९२१६ | गंजे किरण धनाजी | २३२५३ | जाधव विजय कारभारी | २४८१२ | थोरात सागर विलास | |
| ३१८४ | गायकवाड भाऊसाहेब सुकदेव | २३२६७ | जंगम नितेश दत्तात्रय | २४८७९ | पराते किशोर हिरामण | फत्तेबुरुज नाका, जंगली महाराज कमान जवळ, येवला ता.येवला जि.नाशिक |
| १९४९८ | वाकचौरे मयूर सुनील | २३२७९ | कांदेकर राजेंद्र किसन | २५१२० | जगताप गणेश शरद | |
| २०६२७ | बोथे विठ्ठल लक्ष्मण | २३२९२ | गंजे ऋषिकेश एकनाथ | २५२९२ | सोनवणे केशव सोनू | |
| २०७८७ | बटवाल प्रशांत ज्ञानेश्वर | २३२९५ | राजगुरू राहुल केशव | २५३८१ | कवडे प्रल्हाद मधुकर | |
| २०८०७ | गायकवाड संजय आसाराम | २३३०४ | पिंगळे दत्तात्रय कारभारी | २५३८८ | सोमसे कांताराम मुरलीधर | |
| ४८५२ | बोंबले समाधान प्रभाकर | २३३०५ | शितो किरण नंदकिशोर | २५३९२ | गायकवाड नारायण बाबुराव | |
| २०९४८ | त्रिभुवन मोहन भाऊसाहेब | २३३०६ | वारे पंकज अशोक | ८१९२ | वालाके शांता भाऊसाहेब | |
| २१००७ | कुडके भारती चेतन | २३३०८ | दराडे कृष्णा वाल्मिक | २५७८३ | कापसे अण्णासाहेब रामदास | |
| २१०७६ | बटवाल प्रशांत ज्ञानेश्वर | २३३९२ | अहमदनसरी रफिया नेहल | २५८१४ | सागर राहुल रमेश | |
| २१३०७ | शेटे गणेश अशोक | २३४०८ | गायकवाड राहुल अशोक | २५८७२ | बैरागी पुरुषोत्तम गणेश | |
| २१५४४ | शेख नदीम हसन | २३४१५ | आहेर वाल्मिक बाबासाहेब | २५९१९ | थोरात सागर विलास | |
| २१७७७ | ठोंबरे संजय माधव | २३५९५ | गायकवाड प्रवीण रमेश | २५९२१ | राजपूत सीमा सागर | |
| २१८४९ | कारवार दत्तू ठकाजी | २३८६० | पगारे अतुल नामदेव | २५९२३ | थोरात सागर विलास | |
| २१९२४ | शेख जब्बार रज्जाक | २३८८० | मोरे रामकृष्ण जगन्नाथ | २५९७८ | गंजे सोपान धनाजी | |
| २२०८४ | गायकवाड विजय जगन्नाथ | २३९७५ | गायकवाड योगेश बाळासाहेब | २६०२५ | शिंदे राहुल अरुण | |
| २२०९५ | हंडी अंजली नितीन | २३९९२ | शेख जब्बार रज्जाक | ३२४५ | कदम अमोल दत्तात्रय | |
| २२०९८ | पवार सावित्रीबाई शिवाजी | २३९९७ | गंजे किरण धनाजी | २६४४६ | शेलार रवींद्र विठ्ठल | |
| २२१०२ | जानराव नवनाथ चंद्रशेखर | २४१२८ | रायके सागर राजेंद्र | २६४५१ | चव्हाण दिलीप विजय | |
| २२१८२ | क्षत्रिय गणेश राजेंद्र | २४२३५ | जंगम नितेश दत्तात्रय | २६५३९ | चवरे रुपाली रामदास | |
| २२२२१ | वारे पंकज अशोक | २४३४५ | मिटके शंभू श्रावण | २६६७१ | घरू सोनी मनोज | |
| २२२५९ | कांदेकर राजेंद्र किसन | २४४२३ | गंजे ऋषिकेश एकनाथ | २६७४६ | पवार सतीश तुकाराम | |
| २२३१९ | तांगडे सुलोचना बालनाथ | २४५५० | पवार गोरख गोपीनाथ | | | |

**लिलावाच्या अटी शर्ती :-**

१) लिलावात भाग घेणारास रु.२०,०००/-रोख भरुन भाग घ्यावा लागेल.
२) लिलाव मंजूर,नामंजूर किंवा स्थगित करणेचा अधिकार संचालक मंडळाने राखुन ठेवला आहे.
३) अन्य अटी व शर्ती लिलावाच्या वेळी वाचुन दाखविण्यात येतील.

**सही/-**
**शाखाधिकारी**
समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या,कोपरगांव